जा.क्र. मसंकें/विकास/2367/2026
दि. 02/03/2026

# लिलावाची नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत **पश्चिम, गुडधी व शिवणी** विभागाच्या प्रक्षेत्रावरील **चिंच** फळबहाराचा जाहीर लिलाव दि. १०.०३.२०२६ रोजी स. ११.३० वा. करण्याचा ठरविण्यात आला आहे. सदर **चिंच** फळ बहाराचा जाहीर लिलाव मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत **सामान्य विभाग** कार्यालय येथे करण्यात येणार आहे.

तरी इच्छुक व्यापाऱ्यांनी विभागावरील फळझाडांची लिलावाचे पूर्वी पाहणी करून **बंद लिफाफामध्ये लिलाव (बोली) रक्कम दि. ०५.०३.२०२६ ते १०.०३.२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला कार्यालयामध्ये जमा करावे** व लगेच सर्व लिलावधारकांच्या समक्ष दि. १०.०३.२०२६ रोजी स. ११.३० वा. लिलाव बोलीचे बंद लिफाफे उघडण्यात येतील व विभागानुसार सर्वात जास्त लिलाव (बोली) रक्कम असेल त्या लिलावधारकास विभागावरील फळ झाडे दिल्या जातील. करिता इच्छुकांनी सदर लिलावामध्ये भाग घेण्याकरिता स्वखर्चाने अटी व शर्तीचे अधीन राहून जास्तीत जास्त संख्येने हजर रहावे.

**चिंच** फळ बहाराचे विवरण व बंद लिफाफ्यामध्ये भरावयाचा नमुना खालील प्रमाणे आहे.

| अ क्र. | विभागाचे नाव | एकूण झाडे | फळ धारणा झालेली झाडे | लिलाव (बोली) रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | गुडधी | १३५ | १३५ | |
| २ | पश्चिम | ३५० | १५० | |
| ३ | शिवणी | ७५ | ७५ | |

लिलावाच्या अटी व शर्ती मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत सामान्य विभागाचे तसेच संबंधित विभागाच्या सूचना फलकावर लावण्यात आलेले आहे.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंदेकृवि, अकोला

## जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत **पश्चिम, गुडधी व शिवणी** विभागावरील परिसरातील **चिंच** फळबहाराचा जाहीर लिलाव दिनांक **१०.०३.२०२६** रोजी स. **११.३०** वाजता **सामान्य विभाग** कार्यालय येथे करण्यात येत आहे. त्या लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

- **पश्चिम, गुडधी व शिवणी** विभागावरील फक्त **चिंच** फळबहराचा जाहीर लिलावात समावेश आहे.
- इच्छुक व्यापाऱ्यांनी विभागावरील फळझाडांची लिलावाचे पूर्वी पाहणी करून **बंद लिफाफामध्ये लिलाव (बोली) रक्कम दि. ०५.०३.२०२६ ते १०.०३.२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला कार्यालयामध्ये जमा करावे.**
- ज्यांना लिलावामध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांना रुपये **रु.** ३००० अनामत रक्कम म्हणून नगदी भरावे लागतील.
- ज्या व्यक्तींनी **रु.** ३००० अनामत रक्कम भरली असेल त्यांना फक्त लिलावाच्या वेळी प्रक्षेत्रावरील ठिकाणी हजर राहता येईल व त्यांचेच लिलाव (बोली) रक्कमचे बंद लिफाफे उघडण्यात येतील. लिलाव **अनामत रक्कम भरलेल्या** व्यक्तींव्यतरिक्त कोणत्याही व्यक्तीस लिलावा दरम्यान लिलाव स्थळी थांबता येणार नाही.
- फळबहाराची अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाच्या बोली मान्य करणे अथवा नाकारणे हे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील. बोली बोलणाऱ्या पैकी ज्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली असेल त्याला लिलाव समिती मान्यता देईल व ह्याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांनी राखून ठेवलेला आहे.
- लिलावधारकास लिलावाची **१०० % रक्कम लिलावाचे दिवशीच** रोखीने संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेकडे त्वरीत भरावी लागेल.
- लिलावधारकास अंतिम बोलीच्या म्हणजेच लिलाव रक्कमेच्या **१० % रक्कम सुरक्षा ठेव** म्हणून जमा करावी लागेल. सदर सुरक्षा ठेव रक्कम लिलावाच्या अंतिम मुदतीनंतर परत करण्यात येईल.
- ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व ठरलेल्या वेळेवर बंद लिफाफे सादर केलेले व्यापारी हजर नसल्यास लिलाव रद्द करण्यात येईल तसेच तीन पेक्षा कमी बंद लिफाफे असल्यास लिलाव रद्द करण्याचा अधिकार लिलाव समिती घेईल.
- झाडावरील फळे तोडताना झाडांना हानी पोहोचणार नाही याची दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल. बागेतील झाडाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई ठेकेदाराकडून करण्यात येईल व ह्या बाबतचा अंतिम निर्णय संचालक , मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचा राहील.
- फळे तोडून नेण्याची अंतिम तारीख ................................राहील.
- ठेकेदारास विभागावरील फळ बागेतील रखवाली करिता ठेवणाऱ्या व्यक्तीची माहिती प्रभारी अधिकारी **पश्चिम, गुडधी व शिवणी विभाग** यांना द्यावी लागेल व त्यांचेकडून त्यांना गेटपास देण्यात येईल. प्रक्षेत्रावर फक्त गेटपास धारकांनाच प्रवेश राहील.
- झाडांची रखवाली ठेकेदारास स्वतः करावी लागेल राखणदारी करतेवेळी विद्यापीठातील मालमत्तेचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच नुकसान झाल्यास लिलावाची रक्कम जप्त करून झालेली नुकसान भरपाई ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल. तसेच ठेकेदारास फळबागेमध्ये फक्त तात्पुरते रखवाली मचान स्वखर्चाने करावे लागेल, ठेकादारास फळे तोडून नेण्याचे अंतिम तारीखेपर्यंत कायम वास्तव्याची व्यवस्था करता येणार नाही.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंदेकृवि, अकोला